सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. व्याजफ ०५२५/प्र.क्र.६०/आस्था-१, दि. ०४/०७/२०२५.

**विषय** :- पोलिसांना घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत बँकामार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. व्याजफ ०५२५/प्र.क्र.६०/आस्था-१, दि. ०४/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०४१२४४५१९५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 14-07-2025 21:27:23

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३१,३३

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (लेखा).

प्रत :-
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधीक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलिसांना घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत बँकामार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: व्याजफ ०५२५/प्र.क्र.६०/आस्था-१**
नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- ४ जुलै, २०२५.**

**वाचा:-**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२५/प्र. क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५

२) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखा शाखा /गृहबांधणी अग्रिम २०२५-२६/ ११५३/ २०२५, दि.१७.०४.२०२५.

**प्रस्तावना:-**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी दिनांक १७.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये पोलीसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करण्यासाठी १००% म्हणजे रु.१०३,६३,४६,०००/- (अक्षरी रुपये एकशे तीन कोटी, त्रेसष्ट लाख छेचाळीस हजार फक्त) निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीस अनुसरुन पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांना निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५A०८८, ५०-इतर खर्च " पोलिसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या प्रयोजनासाठी एकूण रु.१०३,६३,४६,०००/- (अक्षरी रुपये एकशे तीन कोटी, त्रेसष्ट लाख छेचाळीस हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या विनंतीस अनुसरुन वित्त विभागाकडे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. सदर विनंतीस अनुसरुन वित्त विभागाने बिम्स प्रणालीवर ६०% निधी म्हणजेच रु.६२,१८,०७,६००/- (अक्षरी रुपये बासष्ट कोटी अठरा लाख, सात हजार सहाशे फक्त) एवढा निधी उपलब्ध करुन दिला आहे. पोलिसांना त्यांच्या घरासाठी बँक ऑफ महाराष्ट्र आणि बँक ऑफ इंडिया कडुन घेण्यात आलेल्या कर्जाच्या व्याजातील फरक अदा करण्यासाठी रु.६२,१८,०७,६००/- (अक्षरी रुपये बासष्ट कोटी अठरा लाख, सात हजार सहाशे फक्त) एवढा निधी पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांना वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता वितरीत करण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च "मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५A०८८, ५०-इतर खर्च, पोलिसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढून संबंधितांना प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांना आहरण संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेचा ताळमेळ, महालेखापाल यांच्या कार्यालयाने नोंदविलेल्या खर्चाशी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट-३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी

निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करून त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्चमेळाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करून पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची राहील.

५. सदर अनुदान वित्त विभागाच्या शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र. क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ रोजीच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उपलब्ध निधीच्या मर्यादेत खर्च करणे बंधनकारक राहिल.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३५६/२०२५/व्यय-८, दि.१९.०६.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७०४१२४४५१९५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by AMOL NILAKANTH SAKHARKAR
Date: 2025.07.04 12:45:42 +05'30'

**(अ. नि. साखरकर)**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (गृह-ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (अ. व सु.), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
८) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित,वरळी, मुंबई
९) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), १/२, नागपूर / मुंबई
१०) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), १/२, नागपूर / मुंबई.
११) सह सचिव, पोल-७, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२) उप सचिव, अर्थ-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अवर सचिव, अर्थसंकल्प-३/व्यय-८, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६) निवडनस्ती, आस्था-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

******* ****